Media Coverage – Washroom and Paving Path development for ZP Primary School at Vaduth in Satara



वडूथ येथील प्राथमिक शाळेतील स्वच्छतागृहाच्या लोकार्पण सोहळ्याला लिना देशपांडे व मान्यवर उपस्थित होते.

## वडूथ शाळेत लोकार्पण कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

सातारा : वडूथ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बांधलेले स्वच्छतागृह व पदपथाचा लोकार्पण सोहळा लिना देशपांडे यांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास समिती सभापती वनिता गोरे होत्या.

गोरे म्हणाल्या, 'ग्रामीण भागात ज्ञानदानाचे दर्जेदार काम करणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळांना भौतिक सुविधा पुरविण्यासाठी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून संस्था, संघटनांनी पुढे येण्याची गरज आहे.' यावेळी माजी कृषी सभापती किरण साबळे-पाटील, उपसभापती जितेंद्र सावंत, राहुल शिंदे, दयानंद उघडे, प्रतापसिंह रजपूत, मिलींद कुलकर्णी, जयदीप लाड, गटशिक्षणाधिकारी संजय धुमाळ उपस्थित होते.

## वडूथमधील शाळेत पेव्हिंग पदपथाचे हस्तांतरण

नागठाणे, ता. २१ : वडूथ (ता. सातारा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भारत फोर्ज कंपनीतर्फे बांधलेल्या पेव्हिंग पदपथाचा हस्तांतरण कार्यक्रम झाला. या वेळी कंपनीच्या सामाजिक बांधिलकी विभागाच्या प्रमुख लीना देशपांडे, जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास सभापती वनिता गोरे, माजी कृषी सभापती किरण साबळे-पाटील, उपसभापती जितेंद्र सावंत, सदस्य राहुल शिंदे, दयानंद उघडे, गटशिक्षणाधिकारी संजय धुमाळ, कंपनीचे अधिकारी प्रतापसिंह रजपूत, मिलिंद कुलकर्णी, जयदीप लाड उपस्थित होते.